# असा घडला महाराष्ट्र

## (भाग १)




* प्रमुख संपादक *

प्राचार्य आर. डी. गायकवाड

* कार्यकारी संपादक *

* डॉ. सौ. हेमलता गायकवाड * डॉ. शिवलिंग मेनकुदळे * डॉ. गजानन भोसले * डॉ. शिवाजीराव भोसले

आशा घडवता महाराष्ट्र (भाग १)

Aasa Ghadata Maharashtra

ISBN : 978-93-86703-22-4

प्रथमावृत्ती : ९ मे २०१८

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

प्रकाशक : प्रा. डॉ. सौ. हेमलता रामचंद्र गायकवाड

पत्ता : 'सारंग' बंगला १, यशवंतनगर, गेंडामाळ, सातारा (०२१६२) २५०४७४

मुद्रक व अक्षर रचना : सरस्वती ऑफसेट, मंगळवार पेठ, सातारा. (०२१६२) २८४४३०

मूल्य : ३००/- रूपये (तीनशे रुपये फक्त)

टीप : सदर ग्रंथांत व्यक्त झालेल्या मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

| | | |
|---|---|---|
| १५) आचार्य प्र. के. अत्रे यांचे साहित्य व सामाजिक क्षेत्रातील योगदान | डॉ. शिवलिंग मेनकुदळे | |
| १६) आधुनिक भारताचे शिल्पकार डॉ. पंजाबराव देशमुख | प्रा. डॉ. सौ. कल्पना राजीव पोहित | |
| १७) श्रीपाद अमृत डांगे यांचे कार्य व विचार | प्रा. डॉ. बी. एम. बल्लाळ | |
| १८) जीवनाचे नम्र उपासक – साने गुरुजी | प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम शेठ | |
| १९) शिक्षण महर्षी कै. डॉ. व्ही. टी. पाटील | प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील | |
| २०) क्रांतिसिंह नाना पाटील | प्रा. व्ही. बी. पाटील | |
| २१) निष्काम कर्मयोगी : कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे | डॉ. सुब्राव नामदेव जाधव | २३ |
| २२) कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे | प्राचार्य, मा. के. यादव | २४ |
| २३) स्वामी रामानंद भारती | डॉ. डी. ए. भाने | २३ |
| २४) तत्वनिष्ठ लढवय्या : एस. एम. जोशी | प्रिं. डॉ. अरविंद बुरुंगले | २४ |
| २५) सहकारी चळवळीचे जनक शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊसाहेब हिरे | प्रा. आर. पी. सोनवणे | २४६ |
| २६) महाराष्ट्राचा पोलादी पुरूष : लोकनेते बाळासाहेब देसाई | प्रा. डॉ. विश्वनाथ पवार | २५८ |

# आधुनिक भारताचे शिल्पकार डॉ. पंजाबराव देशमुख

**प्रा.डॉ.सौ.कल्पना राजीव मोहिते**
यशवंतराव चव्हाण कला वाणिज्य महाविद्यालय, इस्लामपूर

डॉ.पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख म्हणजे २०व्या शतकातील विदर्भातील एक लोकोत्तर व्यक्तिमत्त्व होऊन गले ते विदर्भाचे भाग्यविधाते तर होतेच परंतु आधुनिक भारताच्या इतिहासातील शैक्षणिक , राजकीय व कृषी क्षेत्रातील कार्य देदीप्यमान व अविस्मरणीय आहे.

शिक्षणप्रसार, कृषिसुधार, कृषक कल्याण, गोरगरीब दलितांकरीता श्रद्धानंद वसतिगृह, शाळा, अस्पृश्यता निवारण , मिश्रविवाह त्याचबरोबर अमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष, मध्य प्रांताचे कृषी, सहकार, शिक्षण, लोककर्म इत्यादी खात्यांचे मंत्री, स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळातील कृषी मंत्री, शेतकरी मंत्र्यांच्या मंडळाचे परदेशात जाणारे नेते, आंतरराष्ट्रीय ग्रामीण युवक परिषदेचे अध्यक्ष, आशियाई ग्रामीण पुनर्संघ स्थापना, दिल्ली येथील जागतिक कृषी व औद्योगिक प्रदर्शनाचे प्रेरक, कृषिविषयक अनेक संस्थांचे संस्थापक अध्यक्ष, अमरावती येथील शिवाजी एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक, लंडन येथे श्री.शिवाजी एज्युकेशन ट्रस्टची स्थापना, भारताच्या संविधान निर्मितीत अत्यंत हिरीरीने व मोलाचा सहभाग देणाऱ्या व्यक्तीमध्ये त्यांचा अग्रक्रमाने उल्लेख केला जातो. थोडक्यात डॉ.पंजाबराव उर्फ भाऊसाहेब शामराव देशमुख आधुनिक भारताचे शिल्पकार समजले जातात त्यांचे चरित्र नवपिढीने अभ्यासले पाहिजे असे प्रेरणादायी आहे.

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात सामाजिक चळवळ सुरू झाली. इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे बौद्धिक स्वातंत्र्य,

व्यक्तिस्वातंत्र्य, स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता समाजसुधारकांच्यात रूजू लागली. वाईट चालीरीतींवर प्रहार करण्याची क्षमता इंग्रजी शिक्षण घेतलेल्या नवयुवकांमध्ये निर्माण झाली. म.फुले , छत्रपती शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड इ. त्या कार्यांच्या, शिकवणीचा व विचारांचा प्रभाव विद्यार्थी दशेतच डॉ.पंजाबरावांच्यावर झालेला दिसतो. त्या विचारातून पुढे त्यांच्याकडे राजकीय सत्ता आली त्या सत्तेचा वापर त्यांनी गोरगरिबांच्या उद्धारासाठी केलेला दिसते. विद्यार्थीदशा संपल्यापासून म्हणजे १९२७ पासून १९६५ ला निधन होईपर्यंत डॉ.पंजाबरावांनी सर्वांगीण समाजिक सुधारणा करण्याचा प्रयत्न केला.

१९२८ ला अमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष म्हणून त्यांनी लोकविकासाचे ठराव केले. धडाडीचे निर्णय घेवून कार्यान्वित केले त्यामध्ये सक्तीचे प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शाळांवर स्त्री शिक्षिका नेमण्याचा उपक्रम, शिक्षणकर वाढवून साक्षरतेचा प्रसार केला व त्याचा परिणाम म्हणजे अमरावती जिल्हा साक्षरतेच्या बाबतीत देशात दुसऱ्या क्रमांकावर होता. त्याचबरोबर पाणी पुरवठ्याच्या योजना आखल्या, पाणवठयांची योजना राबविली इत्यादी त्यांच्या लोकाभिमुख कार्याची दखल म्हणून १९३० साली मध्यप्रांत वऱ्हाडची कायदेमंडळाची निवडणूक लढवून ते विजयी झाले.

शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुखांच्या कार्यामधील विविध पैलूंमधील शिक्षणाचा पैलू क्रांतिमान असाच आहे. विदर्भाच्या खेड्यापाडयात त्यांनी जे शिक्षणांचे जाळे विणले, समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत शिक्षण पोहचावे म्हणून त्यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली. त्यामुळे त्यांना 'शिक्षण तज्ज्ञ', 'विदर्भाचे शिक्षण शिल्पकार', 'शिक्षण महर्षी ' इत्यादी उपाधींनी संबोधण्यात आले आहे.

शैक्षणिक कार्याचा वारसा महात्मा फुले , छत्रपती शाहू महाराज कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादी समाजसुधारकांच्या परंपरेतील आहे. बहुजन समाजाची उन्नती करण्याची असेल तर विद्येविना ती होऊ शकत नाही हा महात्मा फुलेंचा वारसा छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर

यांनी स्विकारला व तो पुढे नेण्याचे काम डॉ.पंजाबराव देशमुखांनी केले. शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे माणसाला काय दुष्परिणाम भोगावे लागतात याची जाणीव त्यांना लहानपणी होती व त्या जाणिवेतून त्यांनी शिक्षणकार्य केले भारताचा कृषिपुत्र साक्षर झाला तर तो या भूमीला आणि स्वत:बरोबर देशाला सुजलाम् सुफलाम् करील हे ओळखूनच ज्या महापुरुषांनी कार्य केले त्यातील डॉ.पंजाबराव देशमुख एक होते. १९३२ साली त्यांनी अमरावती येथे ''श्री शिवाजी शिक्षण संस्था'' स्थापन केली या संस्थेच्या स्थापनेने विदर्भात एक शैक्षणिक क्रांतीच घडवून आणली त्यामुळे बहुजन समाजातील गोरगरिबांची मुले शिकून उच्चविद्याविभूषित झाली व स्वत:बरोबर त्यांनी समाजविकास करण्यास हातभार लावला. ८५ वर्षापूर्वी डॉ.पंजाबरावांनी या संस्थेच्या रूपाने शिक्षण कार्याचे लावलेले हे रोप त्याच्या विस्तारामुळे ग्रामीण भागातील बहुजन समाजातील विद्यार्थी मागास आणि दलित विद्यार्थ्यांच्या जीवनाला उपकारक ठरले आहे. या संस्थेचे मंत्री खासदार, आमदार, कुलगुरू, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर, वकील, इंजिनिअर , लेखक, कवी, कलाकार, कृषिशास्त्रज्ञ समाजाला दिलेले आहे.

ही संस्था डॉ.पंजाबरावांच्या कार्याचे चिरंतन स्मारक आहे ज्या काळात ही संस्था सुरू केली त्या काळात लोकांना शिक्षणाचे महत्त्व वाटत नव्हते. तेंव्हा डॉ.पंजाबरावांनी शिक्षण संस्था सुरू केल्यानंतर ग्रामीण भागात दौरे काढले. लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले व अशा प्रकारे शाळातील मुलांची उपस्थिती वाढविली. अज्ञान दूर करण्याचा मार्ग म्हणजे शिक्षण या जाणिवेतून डॉ.पंजाबरावांनी शिक्षण कार्य केले. खेडयापाडयातील तळागाळातील सर्वांपर्यंत शिक्षण पोहचवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आपले संपूर्ण आयुष्यच त्यांनी यासाठी वेचले. विचार आणि कृती याचा मेळ त्यांनी घातला. त्यांनी मांडलेल्या शैक्षणिक तत्त्वज्ञानातून याची प्रचिती येते.

त्यांनी अनेक वेळा मांडलेले त्यांचे विचार म्हणजे शैक्षणिक तत्वज्ञान होय ते विचार आजच्या काळातही प्रेरणादायी वाटतात. १९४६ ते १९५० या

कालावधीत भारतीय घटना समितीचे सदस्य म्हणून त्यांनी अभिमानास्पद असे कार्य केले. १७ फेब्रुवारी १९४८ रोजी रंगराव दिवाकर यांनी घटनासमिती समोर मांडलेल्या जातीभेद नष्ट करण्याच्या बिलाला विरोध करताना ते म्हणतात, 'खरी जातीयता व जातीभेद नष्ट करावयाचा असेल तर सर्व स्तरातील शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे.'

१९५८ ला त्यांच्या शिवाजी शिक्षण संस्थेच्या रौप्यमहोत्सव प्रसंगी आयोजित केलेल्या विदर्भ शिक्षण परिषदेत प्राथमिक शिक्षण सर्वांना मिळण्याची म्हणजेच त्यांच्या सार्वत्रिकरणाची व ते सक्तीचे करण्याची कशी गरज आहे हे प्रतिपादन केले व तत्कालीन परिस्थितीत शैक्षणिक प्रगतीत केरळ नंतर अमरावती जिल्हा शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असल्याचे सांगितले याचे श्रेय डॉ.पंजाबराव देशमुख यांना जाते.

शिक्षणाचा लाभ हा ग्रामीण भागातील बहुजन समाजातील इतर मागासलेल्या जातीबरोबरच अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना व्हावा त्याचबरोबरच त्यांच्यासाठी शिष्यवृत्यांची योजना असावी, कृषिविषयक, व्यावसायिक व इतर शिक्षणाकडे शासनाचे लक्ष देण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली होती. आज त्यांचे विचार पूर्णत्वाकडे गेल्याचे दिसते यावरून त्यांची दूरदृष्टी दिसून येते.

थोडक्यात डॉ.पंजाबरावांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचे मूल्यमापन पाहता ग्रामीण व मागासवर्गीयांचे शिक्षणाकरीता प्राथमिक शिक्षण कायद्याने सक्तीचे व्हावे.

शिष्यवृत्त्यांची योजना असावी जेणेकरून ग्रामीण जनता शिक्षणाकडे आकृष्ट होईल.

जातीभेद शिक्षणातून नष्ट व्हावा.

स्त्री शिक्षणाला प्राधान्य द्यावे.

समाजाच्या विकासाचे माध्यम शिक्षण असावे.

शेती हा ग्रामीण भागाचा महत्त्वपूर्ण व्यवसाय आहे यासाठी कृषी शिक्षण देणे आवश्यक आहे.

ग्रामीण विकासाच्या दृष्टीने शिक्षण आणि व्यवसाय यात सांगड असावी.

भारतीय अर्थव्यवस्थेत ग्रामीण जनतेचा उद्धार महत्वाचा असल्याने ग्रामीण जनतेच्या विकासाला प्राधान्य देवून शिक्षण योजना आखाव्यात.

शिक्षणाचा जास्तीत जास्त प्रसार विशेषत: ग्रामीण बहुजन समाजात करणे आवश्यक आहे.

१९२६ ला इंग्लंडवरून उच्चविद्याविभूषित होवून आल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणींना तोंड देण्यासाठी १९२६ साली 'मध्यप्रांत वऱ्हाड शेतकरी संघ' स्थापन करून शेतकरी वर्गाला सामाजिक व राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान मिळवून दिले या संघामार्फत अनेक कृषिविषयक सुधारणा घडवून आणल्या.

१९२८-३० या काळात अमरवती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष म्हणून शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक योजना त्यांनी स्विकारल्या. शेतकरी कार्यक्षम व सुशिक्षित कसा होईल हाच ध्यास त्यांना असे. १९३० च्या मध्यप्रांत वऱ्हाडच्या मंत्रिमंडळात डॉ.पंजाबरावांच्याकडे कृषी खात्याचे मंत्रीपद अपरिहार्यपणेच आले. या काळात त्यांनी कर्जाच्या विळख्यात बुडणाऱ्या वऱ्हाडच्या असंख्य शेतकऱ्यांसाठी १९३२ साली 'कर्जविमोचनाचा कायदा' पास करून घेण्यास जिद्द पणास लावली. हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारी पाशातून वाचविल्या. शेतकऱ्यांची हजारो कुटुंबे कर्जाच्या बोजातून मुक्त केली. मध्यप्रांत वऱ्हाड सरकारने तत्कालीन परिस्थितीत हा कायदा पास केला नसता तर या भागात आज बडे जमीनदार व कष्ट करणारा शेतकरी मजूर असे दोनच वर्ग दिसले असते. यावरून डॉ.पंजाबरावांनी केलेल्या कार्याची प्रचिती येते.

१९५२ ते ६२ अशी दहा वर्षे त्यांनी देशाचे कृषिमंत्री म्हणून कार्यभार सांभाळला या काळात भारताच्या कृषी विकासाच्या दृष्टीने डॉ.पंजाबरावांनी जे कार्य केले ते 'न भूतो न भविष्यती' असेच आहे. कृषी क्षेत्रात त्यांनी आखलेल्या

योजना त्यांची परिपूर्ती या कामगिरीमुळे आमुलाग्र परिवर्तन होवून भारतात हरितक्रांती झाली. भारतीय कृषीला विज्ञानी दिशा मिळाली, अन्न धान्य स्वरूपात भारताला बरीचशी स्वयंपूर्णता प्राप्त झाली भारतात झालेल्या कृषी क्षेत्रातील संशोधनाने जगाचे लक्ष आकर्षित करून घेतले.

२० व्या शतकात जागतिक दृष्टीने पाहता कृषी विज्ञानात बरीच प्रगती झाली होती. परंतु भारतीय शेती आज पारंपरागत पद्धतीनेच केली जात होती. तेव्हा शेतीला विज्ञानाची जोड देवून आधुनिक पद्धतीने शेती करण्यास त्यांनी शेतकऱ्यांना प्रवृत्त केले. सुधारित बी बियाणे, सुधारीत खते, सुधारीत अवजारे, दुबार पीक पद्धती, जलसिंचनाच्या आधुनिक बहुविध पद्धती या दृष्टीने भारतात मुलभूत परिवर्तने व्हावी असा प्रयत्न डॉ.पंजाबरावांनी केला देशाचा कृषी विकास साधायचा असेल तर बदलते आणि नवनवीन कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचले पाहिजे या जाणिवेतून त्यांनी दहा वर्षे कार्य केले.

दोन पंचवार्षिक योजना संबंधात भारताचे अन्न स्वावलंबन करून रोख पिकांना उत्तेजन दिले, योग्य भाव निर्धारित केले १९५२ पासून भारतात जपानी भातशेतीचा प्रयोग यशस्वीपण राबविला. भाताचे उत्पादन वाढविणारी ही पद्धत भारतभर पसरविण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी डॉ.पंजाबरावांनी केली. भातशेतीच्या लागवडीत या पद्धतीने क्रांती केली याचे श्रेय त्यांना जाते. जपानी भात शेतीच्या या अभिनव प्रयोगाच्या यशामुळे भारताने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले व यामुळे डॉ.पंजाबराव तांदूळ उत्पादनाचे तज्ज्ञ म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळखले गेले.

१९५५ साली डॉ.पंजाबरावांनी शेतकऱ्यांसाठी "भारत कृषक समाज" ही संस्था स्थापन केली या संस्थेमार्फत कृषीविषयक परिषदा, मेळावे, प्रदर्शने भरविली. १९५९-६० साली नवी दिल्ली येथे भव्य असे जागतिक कृषी प्रदर्शन भरवून विदेशी शेतकरी भारतीय शेतकऱ्यांपेक्षा किती प्रगत झालेले आहेत हे दाखवून भारतीय शेतकऱ्यांना उद्योगशीलतेची जाणीव करून विज्ञानवादी दृष्टिकोन स्वीकारणे कसे हितावह आहे हे दाखवून दिले.

या सप्ताहामुळे भारतीय शेतकरी विज्ञान निष्ठ बनला. कृषिविषयक [illegible] [illegible] भारतीय [illegible] त्यांनी उपलब्ध करून दिले. [illegible] शेतकरी कृषक. [illegible] [illegible]

डॉ. पंजाबरावांच्या मते कृषिप्रधान देशाने कृषकांना मुख्य स्थानी असल्याने त्यांची सर्वांगीण प्रगती झाली पाहिजे या भावनेतून ते जगले. स्वतंत्र भारताची राज्यघटना लागू झाल्याबरोबर संसद सदस्य या नात्याने डॉ.पंजाबरावांनी अनेक विधेयके सादर करून शेतकऱ्यांच्या हिताची मते निर्भिडपणे मांडली. आपली राजकीय सत्ता या अर्थाने त्यांनी शेतमजूर , शेतकरी, बहुजन समाज यांच्या उद्धाराकरिता वापरली याची प्रचिती लोकसभेचेच डिबेटस् पाहता येते. भारतातील शेतकरी गरीब असल्याने खाजगी सावकार गरजेच्या वेळी अमाप व्याजाने पैसे देऊन जमिनी लिहून घेत त्यामुळे कायम स्वरूपी कर्जबाजारी राहणाऱ्या शेतकऱ्याला या दैन्यावस्थेतून सोडविण्याकरिता डॉ.पंजाबरावांनी १९५५ ला ''मध्यवर्ती कृषी वित्तीय महामंडळाची'' स्थापना केली. भारतातील लाखो शेतकऱ्यांना खाजगी सावकाराच्या पाशातून सोडविण्याचा प्रयत्न त्यांनी या मंडळाच्या माध्यमातून केला.

१९५७ च्या दुसऱ्या सार्वजनिक निवडणुकीत डॉ.पंजाबरावांकडे दुसऱ्यांदा कृषिखातेच दिले गेले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा मुख्य उद्देश शेती क्षेत्राची प्रगती हा होता तेव्हा डॉ.पंजाबरावांनी शेती शेतकऱ्यांचे प्रश्न, सावकार, सावकाराकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक, सहकार इत्यादींची जाण असल्याने त्यांनी शेतकरी हिताचे अनेक निर्णय घेतले.

१९५४-५५ पासून डॉ.पंजाबरावांनी कृषिमंत्री पदाच्या काळात एक मासिक ग्रंथमाला राबविली. "Dr. Panjabrao Deshmukh's Circular letter to Indian Farmers" या नावाने सुरू झालेल्या ग्रंथमालेतून दिल्लीच्या कृषी संशोधन केंद्रात लागलेले कृषिविषयक शोध डॉ.पंजाबराव देशमुखांनी संपूर्ण भारतातील ग्रामीण भागात खेडयापाडयापर्यंत या Circular Letter मार्फत पोहोचविले कृषिक्षेत्रातील कार्य, शेतीसंबंधीची प्रयोग, त्याचबरोबर भारत सरकार शेतीविषयक

काय करीत आहे याची माहिती दर महिन्याला यातून पोहचविली जात होती. कृषिमंत्री असताना भारतभर त्यांनी अनेक दौरे काढून शेतकऱ्यांसमोर आपले विचार मांडलेले दिसतात. शेती, शेतीचे अर्थशास्त्र, शेतीचे प्रश्न, जंगले, जंगलसंपत्ती, शेतमजूर, शेती प्रदर्शने, तंबाखू संशोधन केंद्र, जमीन रेकॉर्ड, सांख्यिकी व आर्थिक रचना इत्यादी अनेक विषयावरील विचार मांडून शेती, नवनवीन बी बियाणे, शेती तंत्रज्ञान, आधुनिक पद्धतीने शेती कशी करावी, जपानी भातशेती याचबरोबर शेतीपूरक जोडधंदे म्हणून कुक्कुटपालन, पशुपालन, मधमाशी पालन, मत्स्य पालन, मच्छिमारी व्यवसाय, शेळी मेंढी पालन, ताडगूळ, निरा, इअरीज, पिगरीज , सफरचंद बागा, केशरबागा , द्राक्ष बागा, आमराया, सुकामेवा इ. उदयोगांना त्यांनी शेतीचे जोडधंदे मानलेत. त्यांच्या मते शेतकऱ्यांनी शेती उत्पादनाला पशुधनाची जोड दिली की, शेतीमध्ये क्रांती व्हायला सुरूवात होते व कृषकक्रांती म्हणजे नव्या समाज व्यवस्थेची अर्थव्यवस्थेची , मुख्य व्यवस्थेची उभारणी करणे होय. ही जाणीव ठेवून डॉ.पंजाबरावांनी अनेक विषयावर शेतकऱ्यांना प्रबोधन केले.

त्याचबरोबर ओलीत शेती, बर्फ शेती, सागर शेती, पर्वतीय शेती, कोरडवाहू शेती, वाळवंट शेती, निर्यात वाढीची शेती, व्यापारी पिके, अन्नधान्याची पिके. औद्योगिक कच्चा माल निर्मिणारी शेती, फळबागा , फुलबागा , पालेभाज्या, मशरूम शेती इत्यादी त्यांचे व्यापक कार्य पाहता त्यांच्या अफाट कार्याची कल्पना येते. त्यांनी अनेक विषयावर शेतकऱ्यांना प्रबोधन केले. बी, बियाणे, आधुनिक अवजारे, कीटकनाशके, इ. वापरांमुळे शेतीचे उत्पादन वाढते याची जाणीव त्यांनी करून दिली. थोडक्यात शेतकरी हा अन्नदाता आहे हीच जाणीव त्यांच्या समोर होती. या जाणिवेतूनच त्यांनी भारत सरकारने शेतकऱ्यांसाठी ज्या ज्या हितावह योजना जाहीर केल्या त्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचविल्या.

शेतकऱ्यांच्या परदेशी अभ्यास दौऱ्याची योजना तिची अंमलबजावणी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून सुरू झाली. परंपरागत पद्धतीने शेती करणाऱ्या भारतीय शेतकऱ्याला अद्ययावत पद्धतीचे शेतीचे ज्ञान व्हावे युरोपियन शेतकरी नवीन पद्धतीने शेती करून शेतीचे अधिक उत्पादन घेत होता. तेव्हा आपल्या

शेतकऱ्यांनीही युरोपात जाऊन आधुनिक कृषिज्ञान पाहून यावे व अज्ञान कमी या हेतूने भारत सरकारमार्फत ही योजना सुरू झाली. १९५७ पासून डॉ.पंजाबरावांच्या कृषिमंत्री पदाच्या काळात त्यांनी ही योजना सुरू केली व भारतीय शेतकरी रशिया, अमेरिका, ऑस्ट्रेलिया इ. देशात जाऊन तेथील प्रगत शेतीचे ज्ञान संपादन करून आले व आपल्या देशात आल्यानंतर ते ज्ञान येथील शेतकऱ्यांना सांगत होते. आजही शेतकऱ्यांनी ही अभ्यास दौऱ्यांची आदान प्रदान योजना कृषिखात्यामार्फत चालू आहे या योजनेचे श्रेय डॉ.पंजाबराव देशमुखांना द्यावे लागते.

कृषि संशोधनात माहितीचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत मार्फत पोहोचण्यासाठी भारतात ठिकठिकाणी कृषी विद्यापीठे स्थापन झाली पाहिजे. यासाठी त्यांनी भारतातील प्रत्येक राज्यात कृषी विद्यापीठ स्थापन करण्याची कल्पना कृषिमंत्री या नात्याने भारत सरकारपुढे मांडली. ती अंमलात येवून भारतातील पहिले कृषी विद्यापीठ उत्तर प्रदेशातील पंतनगर येथे सुरू झाले. आज महाराष्ट्रात देखील अकोला, राहुरी, दापोली इ. अनेक ठिकाणी कृषी विद्यापीठे स्थापन झालेली आहेत. त्यांच्या मते देशाची ग्रामीण भागातील बेकारी दूर करायची असेल तर प्रथम शेती विकास झाला पाहिजे. शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी त्यांच्या तरुण पिढ्या शिकल्या पाहिजेत, बदलते कृषी तंत्रज्ञान त्यांना मिळाले पाहिजे व त्यासाठी कृषी शिक्षण घेण्यासाठी कृषी महाविद्यालये, स्थापन होणे आवश्यक होते व त्या महाविद्यालयांना मार्गदर्शन व नियंत्रित करण्यासाठी कृषिविद्यापीठाची स्थापना झाली पाहिजे. ज्यांच्या या दहा वर्षाच्या अथक प्रयत्नाला यश आले त्यांचे कृषी क्षेत्रातील अमूल्य असे कार्य लक्षात घेवून अकोल्याच्या विद्यापीठाला डॉ.पंजाबराव देशमुखांचे नाव दिले आहे. आज या कृषी विद्यापीठातून कृषी महाविद्यालयातून वेगवेगळ्या कृषिविषयक योजना, प्रकल्प राबविले जात आहेत. संशोधन केले जात आहे. स्वातंत्र्योत्तर भारतात डॉ.पंजाबरावांच्या दूरदृष्टीतून साकारलेल्या विविध कृषिविषयक, शैक्षणिक, सामाजिक संस्था कार्यरत आहेत. सामाजिक क्रांती, शैक्षणिक क्रांती, कृषी क्रांती याद्वारे सर्वसामान्य ग्रामीण जनतेचा विकास यासाठीच त्यांनी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. आधुनिक

भारताच्या जडणघडणीत डॉ.पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांचे योगदान मोठे आहे. ते केवळ विदर्भ, महाराष्ट्राचेच नव्हे तर आधुनिक भारतातील थोर नेते होवून गेले त्यांचे विविधांगी कार्य येणाऱ्या प्रत्येक पिढीला प्रेरणादायी असेच आहे. डॉ.पंजाबराव देशमुख खऱ्या अर्थाने आधुनिक भारताचे शिल्पकार ठरतात.

**संदर्भ –**


१) सावरकर सुदाम, सूर्यकांत रा.ब.(ले) – भाऊसाहेब डॉ.पंजाबराव देशमुख जीवन व कार्य

२) मोहिते उत्तमराव – जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ.पंजाबराव देशमुख

३) पवार ना. ग. – उदयोन्मुख भारतीय समजातील शिक्षण तज्ज्ञ

४) शिवाजी शिक्षणसंस्था अमरावती वार्षिक अहवाल.

५) Constitutent Assembly of India Debates

६) Dr. Panjabrao Deshmukh Union Minister of Agriculture Ministry of Food and Agriculture Govt. of India Circular Letters.

७) भारत कृषक समाज स्मरणिका

८) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
लोकमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख गौरवग्रंथ.


* * *